दुसरी वेळ

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/ 9712/15
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- 27/10/2015

नांदेड वाघाळा शहर महानगरालिका,नांदेड आस्थापनेवरील निलंबीत अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी करण्याकरिता चौकशी अधिकारी पदावर नेमण्यात येणारा अधिकारी हा सेवानिवृत्त होतांना, अपचारी अधिकारी / कर्मचारी यांच्या पेक्षा वरिष्ठ दर्जाच्या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा. तसेच संयुक्त चौकशी मध्ये जेष्ठतम अपचारी अधिका-यापेक्षा कंत्राटी पध्दतीने नेमावयाच्या सेवानिवृत्त चौकशी अधिका-यांच्या सेवेत असतांनाचा दर्जा वरिष्ठतम असावा किंवा सेवा निवृत्त झालेला उप जिल्हाधिकारी असावा.अशा सेवानिवृत्त अधिका-यांमधून कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी पद भरावयाचे आहे. पात्र सेवानिवृत्त अधिका-यानी दि. 04/11/2015 रोजी दुपारी 3.00 वाजे पर्यंत सा.आयुक्त (आस्थापना) मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, प्रशासकीय इमारत माळा क्र. 3 येथे स्वत: येवून अर्ज सादर करावे.

**मानधनः** एक अपचारी कर्मचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी, चौकशीस रुपये 12000/- मानधन राहील. व एकापेक्षा अधिक अपचारी कर्मचा-यांची चौकशी असल्यास त्यासोबतच्या प्रत्येक कर्मचा-यामागे रुपये 1500/- इतके वाढीव मानधन देण्यात येईल. सदर मानधानाची कमाल मर्यादा रुपये 24000/- एवढी राहील.

**इतर अटी व शर्ती:-**

1. सेवानिवृत्त चौकशी अधिका-याचे वय दि.01 जुलै 2015 रोजी 70 वर्षापेक्षा कमी असावे.
2. चौकशी अधिकारी हा शारिरीक, मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
3. चौकशी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायीक कामात किंवा सेवेत चौकशी अधिकारी गुंतलेला नसावा.
4. अर्जदाराकडे विभागीय चौकशी केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
5. अर्जदाराकडे विभागीय चौकशी संदर्भात सर्व प्रचलित कायद्यांचे व नियमाचे आणि शासन निर्णय तथा परिपत्रकांचा अभ्यास असणे आवश्यक आहे.
6. नियुक्ती प्राधिकारणास कामकाजाच्या कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता आणि कोणतेही नोटीस न देता चौकशी अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात यईल.
7. चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आल्याच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या कालावधीत चौकशीचे कामकाज पूर्ण करुन त्यांनी चौकशी अहवाल संबंधित शिस्तभंग विषयक प्राधिका-यास सादर करावा लागेल.
8. सदरची जाहिरात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उलब्ध आहे. त्याचा पत्ता www.nwcmc.gov.in असा आहे.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

---

प्रति,
मा. संपादक, सामना / दै प्रजावाणी
दैनिक,
नांदेड

**विषय:- जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयी विनंती की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे जाहिर प्रगटन या सोबत देण्यात येत असून सदरची जाहिरात दिनांक 29/10/2015 रोजीच्या आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी. तसेच सोबत देण्यात येणारे जाहिर प्रगटन कमीत कमी जागेत अथवा दिलेल्या फॉन्ट मध्ये प्रसिध्द करुन शासन मान्य दर पत्रकासह जाहिरातीचे देयक (दोन प्रतीत) व अंकाच्या 3 प्रती सहाय्यक आयुक्त आस्थापना विभागात सादर करावे, ही विनंती.

12×18 चौसेमी जाहिरात प्रकाशीत करावी

27/10/15
सहाय्यक आयुक्त (आस्थापना)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

C:\31.8.15 backup\administrator my doc\Letter.doc